Maharashtra State
Secondary and Higher Secondary Education,
Kolhapur Divisional Board,
Kolhapur - 416004

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६००४

Phones : Chairman - 2690829 Secretary - 2691405 PBX-2696101,2696102,2696103 FAX:[0231]2690758
E-Mail: divsec.kop@gmail.com Web : sscboardkolhapur.in

**परिपत्रक.क्र.2557 कोविम/उच्च माध्य/फेब्रुवारी/मार्च - 2023 दिनांक:- 12/12/2022**

**विषय:- फेब्रुवारी/मार्च-2023 मध्ये घेण्यात येणा-या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या दिव्यांग/खेळाडू विद्यार्थ्यांचे प्रस्ताव पाठविणेबाबत.**

या परिपत्रकाव्दारे सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालयांना कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा **फेब्रुवारी/मार्च**-2023 परीक्षेसाठी दिव्यांग/खेळाडू विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या सवलती मिळणेबाबतचे प्रस्ताव या कार्यालयास सादर करण्याबाबत खालील कार्यवाही करण्यात यावी.

## अ) दिव्यांग विद्यार्थी सवलत प्रस्तावा बाबत :-

विशेष गरजा असलेले दिव्यांग विद्यार्थ्यांना मिळणा-या सवलतीबाबत ( **सुधारित शासन निर्णय क्र.संकीर्ण** (2017/118/17/) **एसडी 6 दि.16 ऑक्टोबर 2018 नुसार** -

1. विद्यार्थ्यांस हव्या असलेल्या सवलतीची मागणी करतांना अचुक दिव्यांग कोड, कोणती सवलत हवी आहे (उदा.जादा वेळ,लेखनिक,गुणांची सवलत) याचा स्पष्ट उल्लेख प्रस्तावात करावा.
2. मंडळाने निर्धारित केलेल्या विहित नमुन्यातील मुळ वैद्यकीय प्रमाणपत्रावर **मा.जिल्हा शल्य चिकित्सक** यांच्या स्वाक्षरीचे प्रस्ताव सादर करावेत.
3. दिव्यांग प्रस्ताव मंडळास सादर करतांना प्रस्तावावर आवेदनपत्र क्रमांक/बैठक क्रमांक नोंदीसह आवश्यक कार्यवाही पूर्ण करुन परिपूर्ण प्रस्ताव मंडळाने निर्धारीत केलेल्या दिनांकास सादर करावेत.
4. काही कनिष्ठ महाविद्यालयाकडून जादा वेळ/लेखनिक मिळणेबाबतचे प्रस्ताव परीक्षेच्या एक दिवस अगोदर पालकांमार्फत मंडळाकडे सादर केल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे ऐनवेळी प्राप्त प्रस्तावावर कार्यवाही करून विदयार्थ्यास सवलत देण्यास विलंब होतो. तरी सर्व कनिष्ठ महाविद्यालयांनी दिव्यांग विदयार्थ्यांना देय असलेल्या सवलतीचे प्रस्ताव **बुधवार, दिनांक 25/01/2023** पर्यंत मंडळाकडे पोहोचतील अशा बेताने टपालाद्वारे अथवा हस्तपोहोच सादर करावेत.
5. मुदतीनंतर प्राप्त होणा-या प्रस्तावांवर कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही . कोणताही दिव्यांग विदयार्थी सवलतीपासून वंचीत राहिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित प्राचार्याची राहील, याची नोंद घ्यावी.

## ब) खेळाडू विद्यार्थी सवलत प्रस्तावाबाबत :-

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षा **फेब्रुवारी/मार्च**-2023 परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या खेळाडू विदयार्थ्यास जिल्हा विभाग/राज्य/राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत प्राविण्य/सहभागी झाल्याने अशा विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या जादा गुणांची सवलत **सुधारीत शासन निर्णय क्रमाकं उमाशि2015/प्र.क्र.262/एस.डी.2 दि.20/12/2018 नुसार** खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

1. शाळा/कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांनी खेळाडू विद्यार्थ्यांचे विहित नमुन्यातील आपले परिपूर्ण प्रस्ताव **दि.05/04/2023** पर्यंत संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडे सादर करण्यत यावेत.
2. तसेच संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाकडून प्राप्त प्रस्तावाची छाननी करुन **दि. 30/04/2023** पुर्वी परिपूर्ण प्रस्ताव स्पष्ट शिफारशीसह मंडळ कार्यालयास सादर करावेत.

सदरच्या सर्व सूचना नोटीस बोर्डवर लावून सर्व विदयार्थी/पालकांच्या निदर्शनास आणाव्यात. तसेच निर्धारित मुदतीनंतर याबाबत पालकांच्या तक्रारी मंडळाकडे येणार नाहीत, यांची काटेकोरपणे दक्षता घ्यावी. वरील प्रमाणे कार्यवाही न झाल्यास आणि त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्यास किंवा सवलती पासून वंचित राहिल्यास त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी.

उपरोक्त बाबतची सर्व विहित फॉर्म व माहिती मंडळाच्या संकेतस्थळ **www.sscboardkohapur.in** वर उपलब्ध असून त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

**( डी.एस.पोवार )**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

**प्रत-आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

1. **प्राचार्य**, सर्व मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालये, सातारा/सांगली/कोल्हापूर
2. **जिल्हा क्रीडा अधिकारी सातारा/सांगली/कोल्हापूर** यांना कळविण्यात येते की, शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाकडून प्राप्त प्रस्तावाची छाननी करुन **दि. 30/04/2023** रोजी सायंकाळी 5.00 वा.पर्यंत परिपूर्ण प्रस्ताव स्पष्ट शिफारशीसह मंडळ कार्यालयास हस्तपोच सादर करावेत.

**प्रत- माहितीस्तव**- शिक्षणाधिकारी (माध्य) जिल्हा परिषद सातारा/सांगली/कोल्हापूर

Panwalkar/Circular